गणपतराव बोडस यांच्यासारखे गद्य नट.. .. नावं तरी किती आणि कुणाकुणाची घ्यायची? या साऱ्यांनी ही रंगभूमी वाढवली, तिला वैभवाचे दिवस दिले. त्यांचं ऋण मान्य केल्याशिवाय आपण पुढे जाऊच शकत नाही. रंगभूमीच्या पडत्या काळात डॉ भालेरावांनी तिला सावरली. संगीत नाटकाची परंपरा नष्ट होते की काय अशा परिस्थितीत विद्याधर गोखलेंनी तिला संजिवनी दिली. ही खरी कर्तृत्ववान माणसं. यांचं योगदान कसं विसरता येईल. हा मराठी रंगभूमीचा उज्ज्वल इतिहास आहे.

पण इतिहासाचे नुसते गोडवे गाण्यात आपण धन्यता मानायची का ? चांगलं का वाईट ते मला माहीत नाही, पण स्मरणरंजनात रंगून जाणारा माझा पिंड नाही. वर्तमान जगत असताना भविष्याचा वेध घ्यायला मला आवडतं. मी प्रचंड आशावादी आहे पण माझी वृत्ती स्वप्नाळू नाही. हा जर दोष असेल तर तो माझ्यातल्या कलावंतावर मात करणाऱ्या व्यवहारी कार्यकर्त्याचा आहे. माझ्या मर्यादा मी जाणतो. त्यामुळे विचारवंत नसताना तसा आव आणून आपल्याला उपदेश करणं मला जमेल असं मला वाटत नाही. परंतु जवळजवळ चाळीस वर्ष रंगभूमीवर बॅक स्टेज वर्क पासून अभिनय, प्रकाशयोजना, दिग्दर्शन, नाट्यलेखन या सर्व क्षेत्रांत शिकता शिकता मन:पूर्वक काम केल्यामुळे जे अनुभवाचं संचित मला मिळालं त्याच्या बळावर मी माझे विचार मोकळेपणानं आपल्यापुढे मांडणार आहे. तत्वचिंतनापेक्षा व्यावहारिक आणि व्यावसायिक अनुभवाचे हे बोल आहेत. रंगभूमीच्या आजच्या चिंताजनक अवस्थेची त्याला पार्श्वभूमी आहे हे आपण लक्षात घ्यावे.

माझे विचार मांडण्यापूर्वी सुरुवातीला मी, बबन प्रभु, ज्यानं माझ्यातला नाटककार शोधला, कमलाकर सारंग, ज्यानं मला नाटकात आणलं, आणि नंदकुमार रावते, ज्यानी माझ्यातला नाटककार घडवला त्यांच्या स्मृतीला अभिवादन करतो. ही माणसं माझ्या आयुष्यात आली नसती तर सुरेश खरे, अपघातानं का होईना नाटककार म्हणून सेटल व्हायच्या ऐवजी इन्शुअरन्स कंपनीत निवृत्त होईपर्यंत क्लेम्स सेटल करीत बसले असते.

रसिकहो. नाटकाला आपल्या जीवनात मूलभूत स्थान आहे. नाटक हे काही निव्वळ करमणुकीचं साधन नाही. त्यापलीकडे खूप काहीतरी ते आपल्याला देतं, जीवनाचं खरं रुप आपल्याला दाखवतं, जीवनाचा अर्थ सांगतं. अपरिचित अशा अनुभवविश्वाशी आपली ओळख करुन देतं. नाटक हा आपल्या सांस्कृतिक